# मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनई

तालुका नेवासा, जि. अहमदनगर

## साखर विक्री करार पत्र

दिनांक : / /२०१

मी /आम्ही .................................................................... मु. ....................................................................

ता. .................................................................... जिल्हा ....................................................................

खरेदीदार व माझ्या मार्फत साखर खरेदी करणाऱ्यांच्या वतीने मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनई ता. नेवासा यांस लिहून देतो की मी /आम्ही आज रोजी मुळा सहकारी साखर कारखाना लि., सोनई तालुका नेवासा जिल्हा अहमदनगर यांज कडून खालील प्रमाणे साखर पोती त्या ग्रेड समोर दिलेल्या भावात खालील अटीवर व शर्तीवर खरेदी केलेली आहेत .

| अ. नं. | साखरेचा प्रकार | खरेदी केलेली पोती संख्या | भाव प्रती क्विंटल जी.एस.टी. विरहीत |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

**शर्ती व अटी -**

१) साखरेचा एक्स गोडावून डिलीव्हरी माझे/ आमचे खर्चाने घेऊ / घेईल. डिलीव्हरी दिल्यानंतर कारखाना माल परत घेणार नाही हे मला /आम्हाला कबूल आहे. तसेच डिलीव्हरी दिल्यानंतर मालाची काही नुकसान झाल्यास कारखाना जबाबदार राहणार नाही

२) वरील खरेदी केलेल्या मालाची डिलीव्हरी आजपासून दि. / / अखेर घेईन/घेऊ. ठरलेल्या मुदतीत जर साखरेची डिलीव्हरी घेतली नाही तर वरील सौदा खरेदी रद्द करण्याचा सर्व अधिकार आपल्या कारखान्यास राहील तसेच आपल्या कारखान्याने माझ्या / आमच्या जोखमीवर बाजार भावाने अथवा खाजगी रितीने किंवा जाहिर लिलावाने वरील सौद्यापैकी उचलावयाचा शिल्लक राहिलेला माल विकून टाकावा व त्यात होणारे कारखान्याचे नुकासन मी /आम्ही भरुन देण्यास तयार आहे /आहोत

३) मालाचे पैसे डिलीव्हरी देते वेळेस टेंडर मध्ये भरलेल्या रक्कम व्यतिरीक्त त्यावर होणारी जी.एस.टी. सह संपूर्ण रक्कम भरावी लागेल

४) ठरलेल्या मुदतीत माल न उचलल्यास कारखाना ठरविले ते गोडावून भाडे अथवा तत्सम खर्च इ.ची रककम आमचे कडून वसुल करण्याचा आधिकार कारखान्यास राहिल

५) मी कारखान्याचा "क" वर्ग सभासद होण्यास तयार आहे.

६) मालाचे किंमतीपोटी होणारी संपूर्ण रक्कम मालाची डिलेव्हरी होण्यापूर्वी अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुळा फॅक्टरी शाखेत, अगर युनीयन बँक ऑफ इंडिया सोनई शाखेत रोखीने, डिमांड ड्राफ्टने अगर आर.टी.जी.एस. ने भरणेत येईल साखरेच्या मालाची किंमत आगाऊ दिल्याशिवाय मालाची डिलेव्हरी कारखान्याकडून दिली जाणार नाही हे मला / आम्हाला मान्य आहे.

७) या करारातील शर्ती व अटीची पुर्तता कारखान्याचे जागेवर करावयाची आहे.

८) माझेकडून / आमचेकडून वरील अटींचा व शर्तींचा भंग झाला अगर नाही या बाबातचा कारखान्याचा निर्णय अखेरचा राहील हे मला / आम्हाला मान्य आहे.

९) वरील करार व त्याची पुर्तता या बाबत कारखाना व मी /आम्ही खरेदीदार यात काही मतभेत अगर वाद निर्माण झाल्यास महाराष्ट्र सहकारी कायद्यात नमुद केल्याप्रमाणे सदरचा वाद सोडवून घेण्यास तयार आहे / आहोत. तसेच सदरचा वाद नेवासा न्यायकक्षेतंगर्त राहिल यास आमची मान्यता आहोत.

वरील शर्ती व अटी मी / आमही वाचल्या आहेत. त्या मला / आम्हाला मान्य आहेत.

साखर खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याची सही किंवा त्याचे अधिकृत प्रतिनिधीची सही

वरील अटींना व शर्तींता अनुसरून साखर विकली आहे.

कार्यकारी संचालक
मुळा सहकारी साखर कारखान लि., सोनई
ता. नेवासा, जि. अहमदनगर

(नांव ........................................................ )

(करार करून देणार)

(करार करून घेणार)